महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३३/७१२५/लेखा अनुदान २०२४-२५/संकीर्ण/२३/२०२४, मुंबई     दि. ई-स्वाक्षरीत

विषय:- सन २०२४-२५ या वितिय वर्षातील लेखा अनुदान मागणीबाबत.

परिपत्रक:-

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की,सन २०२४-२५ या वितिय वर्षातील मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस या मुख्यलेखाशिर्षांतर्गत असलेल्या विविध उपलेखाशिर्षाखालील उद्दिष्टनिहाय अनुदानाची मागणी करत असताना सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातच फक्त ई-ऑफिस पत्राद्वारे मागणी करण्यात यावी. पोलीस महासंचालक कार्यालयास मागणी करतेवेळी घटक कार्यालयांनी/विभाग प्रमुखांनी पुढीलप्रमाणे दक्षता घेण्यात यावी:-

- प्रत्येक महिन्याच्या दिनांक १ ते ५ पर्यंतच अनुदान मागणीचे पत्र पोलीस महासंचालक कार्यालयास फक्त ई-ऑफिस पत्राद्वारे सादर करण्यात यावे. (ई-ऑफिस सांकेतांक व.का.अ., का.क्र.३३:- anita.rathod1969@gov.in व प्रत ig.admin@mahapolice.gov.in यांना करावे). ई-ऑफिस पत्राव्यतिरिक्त कोणत्याही पत्रव्यवहाराव्दारे मागणी करू नये.
- अनुदान मागणी करतेवेळी विविध लेखाशिर्षांतर्गत प्रत्येक उद्दिष्टनिहाय माहिती नमूद करून कारणमिमांसासह सादर करावे. एखादे उद्दिष्टामध्ये मागणी नसल्यास निरंक नमूद करण्यात यावे.
- प्रत्येक महिन्यात आवश्यक अनुदाना विषयी विभाग प्रमुखांचे योग्य ते समर्थन नमूद करूनच अनुदान मागणी करण्यात यावी. अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर त्याबाबत आढावा घेऊनच पुढील मागणीपत्र सादर करावे.
- सन २०२३-२४ या मागील वितिय वर्षात काही उपमुख्यलेखाशिर्षाखाली घटक कार्यालयांनी आवश्यकतेपेक्षा अधिक प्रमाणात अनुदान मागणी केल्याचे पोलीस महासंचालक कार्यालयाच्या निर्देशनास आले आहे. प्रत्यक्षात मात्र अनुदान वितरित केल्यानंतर काही लेखाशिर्षाखालील अनुदान खर्च न करता परत करण्यात आले,सदरहू बाब घटक प्रमूखांनी/ कार्यालय प्रमुखांनी गांभिर्याने घेणे आवश्यक असून सन २०२४-२५ या वितिय वर्षात अनुदान मागणी करतेवेळी लेखा विषयक बाबींचा योग्य तो आढावा घेऊनच अनुदान मागणीपत्र सादर करणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात खर्च अपेक्षित नसताना देखील अधिक प्रमाणात मागणी करणे, ही बाब असमर्थनीय आहे.
- **घटक कार्यालयांना कळविण्यात येते की,या आर्थिक वर्षात कुठल्याही लेखाशिर्षाअंतर्गत खरेदी प्रक्रिया राबवायची असल्यास माहे सप्टेंबर-२०२४ पुर्वी निविदा प्रिक्रिया पुर्ण करण्यात यावी, असे केल्यास पुर्ण राज्य पोलीस दलासाठी त्या त्या लेखाशिर्षामध्ये आवश्यकता असल्यास पुरवणी मागणीव्दारे अनुदान उपलब्ध करुन घेता येईल. वितिय वर्षाच्या अखेरीस (माहे-जाने ते मार्च) सर्व खरेदी करून खर्च केल्यामुळे वेळीच शासनाला पुरवणी मागणीचे प्रस्ताव पाठविणे शक्य होत नाही व अनुदानाची कमतरता भासते. सर्व घटक प्रमुखांनी याबाबत बैठक घेऊन त्यांचे नियोजन करावे.**

- नमूद दिनांकाव्यतिरिक्त इतर वेळी अगदीच विशेष बाबींकरिता तात्काळ खर्च अपेक्षित असेल तरच घटक प्रमुखांच्या योग्य त्या समर्थनासह/कारणमिमांसासह मागणी करण्यात यावी.
- एक वर्षावरील प्रलंबित देयके शासन मान्यतेसाठी मोठ्या प्रमाणावर घटक कार्यालयामार्फत सादर होत असल्याचे पोलीस महासंचालक कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव सर्व घटक कार्यालयांनी त्यांचेकडील देयके उपलब्ध अनुदानातून विहित कालावधीत अदा होतील,याची दक्षता घ्यावी.
- घटक कार्यालयांची महावितरणची व इतर वीज देयके प्रलंबित असल्याबाबतच्या तक्रारी वारंवार पोलीस महासंचालक कार्यालयास येत असून घटक कार्यालयांना कळविण्यात येते की, अर्थसंकल्प शाखेमार्फत वेळोवेळी ०६-दूरध्वनी, वीज व पाणी या उद्दिष्टामधून उपलब्ध करुन दिलेले अनुदान प्राधान्याने अदा करावे तसेच दरमहा वीज देयकांबाबत महावितरण सोबत संपर्क साधून योग्य ती कार्यवाही वेळेवर करण्यात यावी.
- मागणी क्र.बी-१ २०५५ पोलीस (००)(०१) जिल्हा पोलीस बल (संगणक सांकेतांक क्र. २०५५०१६८) याउपमुख्यलेखाशिर्षामधील २१-पुरवठा व सामग्री व २५-पोशाख, तंबु व भांडारे या उद्दिष्टामध्ये अनुदानाची मागणी पोलीस महासंचालक कार्यालयातील कार्यासन अधिकारी, का.क्र. १८ यांना परस्पर मागणी करावी, सदरील कार्यासनाचे आदेश प्राप्त झाल्यानंतरच संबंधित उद्दिष्टांमध्ये अनुदान वितरणाची कार्यवाही का.क्र. ३३ (अर्थसंकल्प शाखा) मधून करण्यात येते, याची घटक कार्यालयांनी नोंद घ्यावी.
- तसेच, मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस (००)(०७) जिल्हा पोलीस बलातील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण (संगणक सांकेतांक क्र.२०५५ A १९५) या उपमुख्यलेखाशिर्षामधील ५०-इतर खर्च व २०५५ पोलीस (००)(०२) पोलीस भरती (संगणक सांकेतांक क्र.२०५५०६६९) या उपमुख्यलेखाशिर्षामधील १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टामध्ये अनुदानाची मागणी अपोमसं, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना करण्यात यावी. संबंधित कार्यालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतरच संबंधित उद्दिष्टामध्ये अनुदान वितरणाची कार्यवाही का.क्र.३३ (अर्थसंकल्प शाखा) मधून करण्यात येते, याची घटक कार्यालयांनी नोंद घ्यावी.
- तसेच, मागणी क्र.बी-१ २०५५ पोलीस(००)(०७)जिल्हा पोलीस बलातील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण (संगणक सांकेतांक क्र. २०५५ A १९५) या उपमुख्यलेखाशिर्षामधील ५०-इतर खर्च व २०५५ पोलीस (००)(०२)पोलीस भरती(संगणक सांकेतांक क्र.२०५५०६६९) या उपमुख्यलेखाशिर्षामधील १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टामध्ये अनुदानाची मागणी अपोमसं,प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना करण्यात यावी. संबंधित कार्यालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतरच संबंधित उद्दिष्टामध्ये अनुदान वितरणाची कार्यवाही का.क्र.३३ (अर्थसंकल्प शाखा) मधून करण्यात येते, याची घटक कार्यालयांनी नोंद घ्यावी.
- मासिक खर्चाबाबतचे विवरणपत्र पोमसं कार्यालयाच्या का.क्र. ३४ यांना परस्पर सादर करण्यात यावे.
- एखाद्या विशेष वित्त विषयक बाबींकरिता शासनास प्रस्ताव सादर करावयाचा असल्याचा घटक कार्यालयांकडून परस्पर शासनासोबत पत्रव्यवहार होत असल्याचे आढळून आले आहे. तरी घटक कार्यालयांना अवगत करण्यात येते की, वित्त विषयक बाबींचा प्रस्ताव शासनास सादर करतेवेळी योग्य त्या चाकोरीमार्फत पोलीस महासंचालक कार्यालयातील विषयाशी संबंधित शाखेच्या मार्फतीने सादर करणे आवश्यक आहे.

- अर्थसंकल्प शाखेमार्फत जारी करण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

Signed by
Nikhil Jaiprakash Gupta
Date: 04-06-2024 15:08:39
(डॉ. निखिल गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
यांचेकरिता.

प्रति,

पोलीस महासंचालक,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य मुंबई (सस्न
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)
अपर पोलीस महसंचालक (नियोजन व समन्वय/ राज्य राखीव पोलीस बल/ वाहतूक/ फोर्सवन/ दहशतवाद विरोधी पथक/ आर्थिक गुन्हे शाखा/ नागरी हक्क संरक्षण/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषक विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म. राज्य पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरिक्षक/पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग,पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे/ महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
पोलीस उप महानिरीक्षक,गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प, नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे/ नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गासह)
सर्व समादेशक,राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १९
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण वियालये (राज्य राखीव पोलीस प्रशिक्षण केंद्र नानवीज सह)
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण शाळा, नाशिक
कार्यकारी अभियंता,वाहतूक अभियांत्रिकी पथक, मुंबई

**प्रत कार्यवाहीसाठीः-**

**कार्यासन अधिकारी**, का.क्र.१७, १७-अ, १८, १९, १९-अ, २१-अ, २८, २८-अ
२/- कार्यासन अधिकारी यांना कळविण्यात येते की, अनुदान मागणी विषयक कोणतेही प्रस्ताव शासनास सादर करतेवेळी का.क्र.३३ (अर्थसंकल्प शाखा) सोबत निधीच्या उपलब्धतेबाबतची खात्री करुनच शासनास प्रस्ताव सादर करण्याची पुढील कार्यवाही परस्पर करण्यात यावी. शासनास प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रत कार्यासन क्रमांक ३३ यांना सादर करावी.

**कार्यासन अधिकारी**,का.क्र.३४

२/- पोलीस पाटील प्रवास भत्ता विषयक प्रस्ताव/ सानुग्रह अनुदान प्रस्ताव शासनास सादर करण्यात आल्यानंतर प्रत कार्यासन क्रमांक ३३ यांना सादर करावी.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २१-अ

२/- उपमुख्यलेखाशिर्ष (००)(०१) संचालन व प्रशासन (संगणक सांकेतांक क्र. २०५५०६६९) या उपमुख्यलेखाशिर्षामधील २०-इतर प्रशासकीय खर्च या उद्दिष्टामधील व नक्षल विषयक अनुदान मागणीचे पत्र मार्फतीने सत्वर कार्यासन क्रमांक ३३ यांना सादर करण्यात यावेत.

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई

२/- यांना कृपया सदरहू परिपत्रक व त्यासोबतची प्रपत्रे दि.३०/०३/२०२५ पर्यंत mahapolice.gov.in या संकेतस्थळावर मराठीमध्ये सन २०२४-२५ या वित्तिय वर्षातील लेखा अनुदान मागणीबाबत तसेच English मध्ये Regarding Grant Demand For Financial Year 2024-25 या शिर्षासह फ्लॅश करण्यात यावे.

प्रत,

कार्यासन अधिकारी, का.क्र. ३२, ४०, ४१, ४२

# मागणी विवरणपत्र

| मुख्यलेखाशिर्ष २०५५ पोलीस ---------------------------------------- (संगणक सांकेतांक:-------------) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | उद्दिष्टे | प्राप्त अनुदान | खर्च झालेले अनुदान | आवश्यक अनुदान | सविस्तर कारणे |
| १. | | | | | |
| २. | | | | | |